## प्रकरण दुसरे

# पंडित नेहरू यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण २

# पंडित जवाहरलाल नेहरु यांचे फाळणीसंबंधीचे विचार

भारतीय स्वातंत्र्यलढयातील थोर नेते, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व आंतरराष्ट्रीय दर्जाचे श्रेष्ठ, मुत्सदी नेते असा उल्लेख पंडित नेहरुंचा करता येईल. पंडित नेहरुंचा जन्म अलाहाबाद येथे दि. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी काश्मिरी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडिल मोतीलाल नेहरु एक नामांकित वकिल व स्वातंत्र्य लढयातील एक ज्येष्ठ पुढारी होते. मोतीलाल नेहरुंनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर पैसा व प्रतिष्ठा मिळविली होती. पंडित नेहरुंच्या आईचे नाव स्वरुपराणी होते. जवाहरलाल नेहरुंची आई धार्मिक वृत्तीची होती.

जवाहरलाल यांचे प्राथमिक शिक्षण घरीच उत्तम शिक्षकांकडून पार पडले. त्यापैकी फर्डिनांट ही ब्रुक्स या शिक्षकांने जवाहरलाल यांच्यामध्ये विज्ञानाची व वाचनाची आवड निर्माण केली. शिवाय ब्रुक्स स्वतः थिऑसॉफिस्ट आणि ॲनी बेझंट यांचे शिष्य होते. त्यामुळे जवाहरलाल यांच्या कोवळया मनावर काही काळ थिऑसॉफिस्टचा प्रभाव होता. त्याचे मन प्राचीन धर्मग्रंथांकडे आकृष्ट झाले. त्यांनी उपनिषदे, भगवद्‌गीता, महाभारत, रामायण याचे वाचन केले. पंडितजींचे एकूण बालपण काहीशा संमिश्र वातावरणात पार पडल्याचे दिसून येते.(१)

जवाहरलालचे प्राथमिक शिक्षणाची तयारी घरी झाल्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९०५ मध्ये इंग्लंडमधील हॅरो या प्रसिध्द विद्यालयात दोन वर्षे शिक्षण घेऊन पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी १९०७ साली ट्रिनिटी महाविद्यालयात (केंब्रीज विद्यापीठ) ते दाखल झाले. हॅरो येथे असताना त्यांना बक्षिस म्हणून ट्रीव्हेल्यून लिखित गॅरिबॉल्डीच्या चरित्राचा एक भाग मिळाला. या चरित्राचे इतरही खंडही त्यांनी मिळविले. काव्हूर, मॅझिनी व गॅरिबॉल्डी याप्रमाणे आपणही आपल्या देशासाठी काहीतरी करावे, अशी प्रबळ इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली.

यावेळी भारतात वंगभंग चळवळ जोरात होती. परदेशी मालावरील बहिष्कार, स्वदेशीचा पुरस्कार व सशस्त्र क्रांती हा केंब्रीज विद्यापीठातील भारतीय विद्यार्थ्यांचा एक चर्चेचा विषय होता. त्यावेळचे सारे विद्यार्थी लोकमान्य टिळकांच्या पक्षाकडे म्हणजे जहाल राष्ट्रवादीकडे आकर्षित झाले होते. पंडित नेहरुही त्याला अपवाद नव्हते. या सुमारास पंडितजींनी श्यामली कृष्ण वर्मा, गोपाळ कृष्ण गोखले, बिपिनचंद्र पाल, इत्यादी राष्ट्रीय नेत्यांची भाषणे ऐकली. याचाही परिणाम जवाहरलाल यांच्यावरती झाला. १९०५ च्या रुसो जपानी युध्दाचा त्यांच्या मनावर परिणाम झाला.

भूशास्त्र, रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र हे तीन विषय घेऊन ते दुसऱ्या वर्गात पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी बॅरिस्टरीची पदवी परीक्षा दिली व हिंदुस्तानला १९१२ साली परतले. या सात वर्षांच्या इंग्लंडमधील वास्तवात त्यांनी बर्नार्ड शॉ लॉ, डिकिन्सन, आयव्हॅन घलॉक, हॅवलॉक एलिस एबिग क्राप्ट, ऑटो व्हायनियर, ऑस्कर वाईल्ड, वाल्टर पेटर इत्यादी प्रसिध्द लेखकांची पुस्तके वाचली. त्यांच्या मनावर इंग्लंडमधील उदारमतवादी विचाराचाही परिणाम होता. फेबियन समाजवादी चळवळीकडे आणि इतर समाजवादी विचारांकडे ते आकृष्ट झाले.

जवाहरलाल १९१२ साली इंग्लंडहून शिक्षण पूर्ण करून भारतात परत आले. प्रारंभी काही काळ त्यांनी वकिली करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांचे मन रमले नाही. इंग्लंडमध्ये असतानाच त्यांना राजकारणाविषयी ओढ लागून राहिली होती. सन १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधीजींशी त्यांची पहिल्यांदा भेट झाली. अन्यायाचा नुसता निषेध करुन उपयोग नाही तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे आणि हा प्रतिकार अहिंसात्मक असला पाहिजे. या गांधींच्या सूत्राने ते त्यांच्याकडे विशेष आकर्षित झाले. ब्रिटीश सरकारशी लढताना भीती वा द्वेष यांना थारा देता कामा नये हा गांधींचा नियमही त्यांना पटला होता. (२)

गांधीजींनी १९२१ मध्ये असहकारची चळवळ उभी केली. त्या असहकार चळवळीत पंडित नेहरुंना प्रथम अटक झाली. तुरुंगात जाण्याचा हा त्यांचा पहिला प्रसंग होता. जवाहरलाल प्रथम १९२३ मध्ये कॉंग्रेस पक्षाचे सरचिटणीस झाले. त्यावेळी ते अलाहाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष होते. पण पक्षाचे कार्य व नगरपालिका या दोन्ही गोष्टींत त्यांना पक्षकार्य महत्त्वाचे वाटले. म्हणून त्यांनी नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व त्यांनी पक्षकार्यास वाहून घेतले. सरचिटणीस हे पद त्यांनी दोन वर्षे सांभाळले.(३)

तरुण नेहरुच्या मनावर पित्यांचा प्रभावही फार मोठा होता. मोतीलाल यांचे व्यक्तिमत्व प्रभावीही होते. सामाजिक चालीरीती व रुढी यांच्यविषयी त्यांना फारशी आस्था नव्हती. त्यांची मते सर्वांनाच पटतील अशी नव्हती पण त्यांची उपेक्षा करणे कुणाला शक्य नसे. सर्वत्र त्यांच्याविषयी दरार आणि आदर होता. सामाजिक रुढींच्याबद्दल जवाहरलाल हे बंडखोर होते. या बंडखोरीचे मूळ जर पित्यात शोधले तर ते फारसे चूक ठरणार नाही. १९३८ साली जॉन गुंथरला लिहिलेल्या एका पत्रात नेहरुंनी म्हटले आहे की, त्यांचे वडिल व गांधीजी या दोन व्यक्तिंचा ठसा त्यांच्या मनाववर फार मोठा आहे. काही वर्षानंतर मोतीलालजींच्या विषयी बोलताना नेहरुंनी म्हटले आहे की, त्यांच्या मनावर मोतीलालांचा जो मोठा ठसा उमटला आहे, त्याचे कारण ते पिता होते. हे नव्हे तर मोतीलाल बंडखोर होते, झुंजार होते असे आहे. (४)

पंडित जवाहरलाल नेहरुंच्या भारताच्या राजकीय मंचावरील प्रवेशाच्या काळात टिळक आणि गांधींच्या नेतृत्वात क्रमाक्रमाने कॉंग्रेसने नवा अविष्कार धारण केला होता. पाश्चिमात्य उदारमतवाद आणि मानवतावाद नेहरुंच्या मनात खोलवर रुजला होता? मात्र नेहरुंचा मानवतावाद धर्नप्रणित मानवतावादापेक्षा निराळा होता. माणसाची श्रेष्ठतम अवस्था प्राचीन काळात होती. पुढे कालक्रमानुसार त्यात अध:पतन होत गेले, पुढे आणखी होणार आहे. म्हणजे माणसाचा वर्तमानकाळ हा वाईट तर भविष्यकाळ हा त्याहून भयानक राहणार आहे. ईश्वरभक्ती, अनुष्ठान, जप-तप आणि कर्मकांडांचे काटेकोर

पालन केल्यानेच मनुष्य या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकेल असेच जागातील कोणताही धर्म सांगतो. धर्मप्रणित मानवतावाद आणि भूतदयावाद यांना या चौकटीतच आशय असतो. धर्माच्या या प्रकारच्या शिकवणीने मनुष्य कर्मकांडांचा आणि परंपरेचा गुलाम होतो. नेहरुंच्या मानवतावादात या तथाकथित मानवी अध:पतनावर विश्वास नाही. ते म्हणतात, माणसात अशा काही क्षमता आहेत की ज्यामुळे तो अद्याप टिकून आहे आणि पुढेही टिकणार आहे. एवढेच नव्हे तर कालक्रमाने प्रत्येक पुढील अवस्थेत तो अधिक उच्चतर, अधिक सुधारित पातळीत जगतो, जगणार आहे, असा दृष्टिकोन पंडित नेहरुंनी धर्माबाबत मांडला आहे.(५)

नेहरुंना धर्माबद्दल कमालीची अनास्था होती. त्याच्या मते, धार्मिकदृष्टी आणि पारंपारिक विचार ते स्वीकारु शकत नव्हते. धर्मप्रणित खोटा विश्वास माणसाच्या कर्तृत्वास मारक ठरतो, असे शरणार्थी होणे मला पसंत नाही, त्यापेक्षा खुल्या सागराशी झुंजणे मी पसंत करीन. अगदी त्यातील वादळांशी सुध्दा! असे नेहरु म्हणतात. जगातील निरनिराळया धर्माबद्दल ते लिहितात, भारतात आणि अन्यत्र आज ज्यांना धर्म म्हणतात त्याचे कृत्ये पाहून मी भयकंपित होतो. निरनिराळया मानवी समूहाचे ते पूर्वग्रहदूषित दूराग्रह आहेत. मला त्याचे मुळीच आकर्षण नाही. या सर्व धर्मांची नेहरुंना घृणा वाटत होती.(६)

जमातवादाचा तर नेहरुंना अत्यंत तिटकारा होता. जातीवाद आणि जमातवाद ही अत्यंत संकुचित विचाराची प्रतिकं आहेत असे त्याचे मत होते. . या मनोवृत्तीत परजाती विषयी आणि परजमातीविषयी भीती, संशय आणि द्वेष असतो हे उघड आहे. या मनोवृत्तीत स्वजातीविषयी, स्वजमाती विषयी किंवा स्वधर्माविषयी ही प्रेम नसते असे नेहरु म्हणतात. निरनिराळया जाती-जमातीतील उच्चभ्रु घटक स्वत:च्या वर्गीय हितासाठी जातीयवाद आणि जमातवादाचा आश्रय घेतात. आपापल्या धर्मगटातील सामान्य माणसांना या विषारी विचारांची भूल देवून आपल्या वर्गीय डावपेचांसाठी राबवतात. या

घाणेरडया संघर्षातून या जाती जमातीतील मध्यम वर्गाला काही नोकऱ्या तर उच्चम वर्गीयांना सत्तेत थोडी भागीदारी मिळते. यासाठीच त्यांनी हा उपद्व्याप केलेला असतो. परंतु तद्नंतर विद्वेषाच्या वणव्यात ज्या सामान्य माणसाच्या संसाराची राखरांगोळी होते त्यांना मात्र काही मिळत नाही असे जमातवादाविषयी नेहरुंचे मत होते.(७)

अल्पसंख्यांकातील अशिक्षीत सामान्य माणसाचा जमातवाद प्रामाणिक असू शकतो असे नेहरु मानीत असले तरी तोही त्यांना समर्थनीय किंवा क्षम्य वाटत नाही. सर्व प्रकारच्या जमातवादावर ते कठोर टीका करतात. ते लिहितात, भारतीय मुस्लिम जमातवादसुध्दा काल्पनिक आणि अर्थहीन आहे. माणसांमध्ये केवळ धर्माचाच अनुबंध असतो. राष्ट्र वगैरे काही नसते. आधुनिक संस्कृतीचा आणि प्रगतीचा त्याग करुन आपण मध्ययुगीन अप्रगत जीवन पध्दतीचा स्वीकार करावा असा त्याचा आग्रह असतो. लोकतंत्र, व्यक्तिस्वातंत्र्य काही नको. त्यापेक्षा एकाधिकारशाही किंवा परकीय सत्ता बरी असा त्याचा आशय असतो. माणसाला अविचारी बनवणारी ही एक मनाची भावनोत्कता आहे. सत्याला विशेषत: आर्थिक वास्तवाला सामोरे जाण्याच्या असमतेचे ते लक्षण आहे. नेहरुंच्या मते हा विचार राजकीयदृष्टया अर्थहीन तर आर्थिकदृष्टया केवळ कल्पना रम्य आहे. त्याविषयी विचारच न केलेला बरा असे नेहरु मत नोंदवितात.(८)

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पंडित नेहरुंची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य म्हणून त्यांची पक्षावर जबरदस्त पकड होती. पण काँग्रेसचा पुढारी या नात्याने त्यांनी आपले मत इतर सदस्यांवर कधीही लादले नाही. काँग्रेस पक्षाचे कार्य हे सामूहिक जबाबदारीचे आहे, असे तत्त्व त्यांनी प्रस्थापित केले. काँग्रेसपक्षामध्ये गांधी असोत वा नेहरु, या नेत्यांनी दुसऱ्या पक्षाला आपले मत पटवून द्यावयाचे असेल तर प्रत्येक गोष्ट एक शैक्षणिक कार्याप्रमाणे पटवून दिल्यानंतर निर्णय होत असे.

भारतातील त्या काळातील जातीयवादाबद्दल नेहरुंचे असे ठाम मत होते की, जात ही प्रस्थापित राजकारणाप्रमाणे आणि बदलत्या राजकारणाच्या स्वरुपानुसार तयार होत असते. त्यावेळी काँग्रेसमध्ये वेगवेगळे जातीय गट दबाव पक्षाप्रमाणे कार्यरत होत. नेहरुंच्या दृष्टिकोनातून मुस्लिम लीगचा जातीयवाद हा आवाहनात्मक बाब होती. हा जातीयवाद एकंदरीत परिस्थितीचा एक भाग होता. हा जातीयवाद भारताच्या ऐक्याच्या दृष्टिने चिंतेची बाब म्हणून प्रस्थापित झाली होती असे नेहरुंचे मुस्लिम जातीवादाबद्दल मत बनले होते.(९)

पंडित नेहरुंनी १९३५ च्या कायद्यास कठोर विरोध केला होता. त्यांच्या मते हा मसुदा गुलामगिरीचा होता. एका इंग्रजी वार्ताहरापुढे नेहरुंनी भारतीय जातीयवाद ही राजकीय, आर्थिक आणि मध्यमवर्गीयांच्या राजकारणामुळे फोफोवते असे वक्तव्य केले. भारतीय राजकारणात हिंदू-मुसलमानांतील नेते मंडळी ज्यांना सामाजिक व राजकीय घडामोडींचे कसलेही ज्ञान नसते व त्यांना फक्त विधिमंडळाच्या निवडणुकीत उमेदवारी हवी असते. ती मिळविण्याकरिता जे जे राजकारण करता येईल असे राजकर्ते मंडळी जातीचा आधार घेऊन जातीयवाद पसरवितात असे नेहरुंचे मत होते. या सर्व गोष्टींचा फायदा छोटया छोटया अल्पसंख्याकांना मिळू लागला. ही एक भारतीय राजकारणात कोंडी निर्माण झाली. विधिमंडळात प्रत्येक जातीला संरक्षण आणि महत्त्वाचे स्थान मिळण्याकरिता, मुसलमान, शीख व मागासवर्गीयांमध्ये मतभेद वाढू लागले असे नेहरुंना वाटते.(१०)

डिसेंबर १९२८ च्या कलकत्ता काँग्रेसमधील भाषणात नेहरु असे म्हणाले की, भारताच्या परराष्ट्राच्या धोरणात जातीयवाद हा एक धोका आहे. भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले वेगळे अस्तित्व किंवा दबदबा निर्माण करावयाचे असेल तर भारताने एकजुटीने उभा राहण्याची गरज आहे. भारतात कोणत्याही प्रकारच्या जातीयवादामुळे फुटीरतेची भावना असू नये असे मत नेहरुंनी मांडले.(११)

यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की नेहरुंना जातीच्या आधारे देशाचे विभाजन होणे हे आवडण्यासारखे नव्हते. त्यांचा भारताच्या फाळणीला विरोध होता.

नेहरुंचे व्यक्तिमत्व कोणालाही चटकन आकर्षित करु शकेल असे प्रभावी होते. १९३७ च्या निवडणुकीत त्याच्या व्यक्तिमत्वामुळे कॉंग्रेसपक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले होते. या निवडणुकीचे नियोजन जबाबदारी त्यावेळी कॉंग्रेस कार्यकारिणीवरती होती. त्यावेळी कॉंग्रेस कार्यकारिणीचे अध्यक्ष सरदार पटेल होते. कॉंग्रेसमधील अनेक नेत्यांमध्ये नेहरूंचे व्यक्तिमत्व हे उठावदार होते. त्यामुळे या निवडणुकीत नेहरुंच्या प्रयत्नास भरपूर यश मिळाले व कॉंग्रेस पक्षालाही स्पष्ट बहुमत मिळाले. परंतू १९३७ च्या निवडणुकीत मुस्लिम बहुप्रांतात कॉंग्रेसला भरघोस यश मिळाले नाही ह नेहरुंनी मान्य केले.

१९३७ च्या निवडणुकीनंतर नेहरुंच्या मुस्लिम लीगबद्दल मत बदलल्याचे दिसून येते.

नेहरु म्हणतात, मुस्लिम लीगमधील नेत्यांनी अनेक पत्रके व मागण्या प्रसिध्द केल्या आहेत. मी त्यातील काही वाचल्या आहेत. मुस्लिम लीगचे पत्रक किंवा मागण्यांमध्ये राजकीय व आर्थिक संदर्भ मला सापडत नाही. मुस्लिम लीगने इस्लाम धोक्यात आहे असाच गोंधळ घातला आहे. निवडणुकीत आले उमेदवार केले आहेत. महमंद अली जीना यांनी 'अल्ला' व 'कुराण' यांच्या नावावर मदत मागायला सुरुवात केली आहे.(१२) अशाप्रकारे जातीय व धार्मिक बाबी राजकारणात आणणे म्हणजे भारतासाठी काळ या युगाची सुरुवात करणे आहे असे नेहरुंचे मत होते. नेहरु यांनी वारंवार बॅ. जीना यांना कॉंग्रेसचा दृष्टिकोन, धोरणे समजावून सांगून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. पण जीना यांचा प्रतिसाद थंडच होता.

१९३८ मध्ये नेहरु युरोपच्या भेटीवरुन परत आले तेंव्हा त्यांना एक मोठा धक्का बसला कारण मुस्लिम लीगचा जाहीरनामा हा जर्मनीमधील नाझी पक्षाचा जाहीरनामा यामध्ये मोठया प्रमाणात साम्य होते. नेहरू लिहितात - मुस्लिम

लीगमधील नेते नाझीचा पाठपुरावा करावयास लागले आहेत. ते लोकशाहीविरोधी फॅसिस्ट विचार पसरवत आहेत. त्यांची नकारात्मक विचारसरणी पसरवत आहेत. ही विचारसरणी हिंदू-विरोधी, कॉंग्रेसविरोधी व देशविरोधी आहे. नाझींनी ज्यू विरोधी जी भूमिका उचलली ती भूमिका लीगने उचलल्याचे दिसून येत आहे. नेहरुंच्या मते अशाप्रकारे मुस्लिम लीग भारतीय ऐक्याला बाधा आणत आहे. (१३)

नेहरुंनी मुसिलम लीगच्या अपप्रचाराच्या तीन मुद्यांचे खंडन केले आहे. हे तीन मुद्दे मुस्लिम विरोधी नाही हे पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. मुस्लिम लीगच्या अपप्रचाराचे तीन मुद्दे - (१) जनसंपर्क अभियान, (२) राष्ट्रगीत, (३) कॉंग्रेसचा झेंडा. या तीन मुद्यांविषयी मुस्लिम लीगच्या मनात शंका होती ती दूर करण्याचा नेहरुंनी पुरेपूर प्रयत्न केला.

**१) जनसंपर्क अभियान -**

नेहरुंनी मुस्लिम लीगचे नेते नवाब महंमद इस्माईल यांना लिहिले की कॉंग्रेसची ही मोहित मुस्लिम विरोधी नाही ती सर्व धर्माच्या लोकांना एकत्र आणण्यासाठीच चालविलेली आहे.

**२) राष्ट्रगीत -**

वंदे मातरम् हे गीत १९०५ च्या बंगाल फाळणीमध्ये प्रसिध्दीस आले व ते ब्रिटीश साम्राज्याच्या पिळवणूकीविरुध्द निर्माण केले आहे.

**३) कॉंग्रेसचा झेंडा -**

ध्वज हा सर्व धर्माचे प्रतिक आहे. यामधील केसरी रंग हिंदू धर्माचे प्रतिक आहे. हिरवा रंग मुस्लिम धर्माचे प्रतिक आहे तर पांढरा रंग सर्व अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधीत्व करत आहे. (१४)

वरीलप्रमाणे नेहरुंनी मुस्लिम लीगला कॉंग्रेसविषयी असणाऱ्या शंकेखोर मुद्यांचे स्पष्टीकरण केले आहे.

पंडित नेहरुंचा पाकिस्तान निर्मितीविषयीचा दृष्टिकोन अभ्यासावयाचा असेल तर त्यांच्या भाषणाचा व लेखाचा आढावा घ्यावा लागेल.

पाकिस्तानविषयीच्या दृष्टिकोनासंबंधी त्यांनी महत्त्वाची भाषणे, लेख यांचा अभ्यास केला तर नेहरुंची भारत पाकिस्तान फाळणी संबंधी भूमिका काय होती? हे समजून येईल.

जवाहरलाल नेहरुंनी अगदी मोकळेपणाने त्याचे पाकिस्तान विषयी विचार मांडले आहेत. नेहरु म्हणतात, आजच्या या अणुबॉम्बच्या जगात पाकिस्तानच्या निर्मितीला कोठेच जागा नाही. जुलै १७, लाहोर येथे पत्रकार परिषदेत नेहरु म्हणतात, स्वतंत्र मतदारसंघ रद्द केले पाहिजेत. आजचे जे सर्व जातीय प्रश्न सांप्रदायिक प्रश्न हे स्वतंत्र मतदारसंघामुळेच निर्माण झालेले आहेत.

धार्मिक किंवा सांप्रदायिक तणाव निवळणे हे राजकारणाच्या दृष्टिने गरजेचे आहे का? असे विचारले असता नेहरुंनी उत्तर दिले की, सैध्दांतिकदृष्टया हे गरजेचे नाही परंतु भारतातील अस्पृश्यता नष्ट करणे व हिंदू-मुसलमानातील तणाव निवळणे हे भारतीय स्वातंत्र्य लढयाला हितकारक ठरेल, पण कदाचित असे होऊ शकते. या गोष्टी घडण्याअगोदर भारताला स्वातंत्र्य मिळून जाईल. नेहरुंच्या मते, कोणत्याही पुरोगामी व स्थिर राष्ट्राच्या निर्मितीसाठी एकसंघता, एकता आणि सामाजिक समता या मूलभूत गोष्टी आवश्यक आहेत. या मिळविल्याखेरील अथवा याशिवाय सरकार चालवण्यामध्ये वेळोवेळी अडथळे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सांप्रदायिक सद्भाव/एकता स्वातंत्र्य अधिक मिळाले तर ते अतिशय हितकारक ठरेल.(१५)

पंडित नेहरु पुढे म्हणाले, कॉंग्रेस व लीग यांच्यातील मतभेद हा मंत्रिमंडळातील जागा वाटपाबाबत नाही तर तो तत्त्वाचा प्रश्न आहे. कॉंग्रेसची मूलभूत तत्त्वे ठरलेली आहेत. कॉंग्रेस हे राष्ट्रीय स्तरावरती वाढलेली संघटन आहे. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाला मूलभूत तत्त्वे सोडून देणे शक्य नाही ही मूलभूत तत्त्वे सोडून देणे म्हणजे अस्तित्वात असलेली कॉंग्रेस संपवल्यासारखी होईल.

मुस्लीम लीगच्या सध्याच्या धोरणाबद्दल विचारले असता नेहरु म्हणाले, मुस्लीम लीगचा दृष्टिकोन फुटीर आणि मध्ययुगीन समाजाचा आहे. त्यांना

याचाच अर्थ एखाद्या धार्मिक समूहाने राजकीय पक्ष म्हणून काम करणे हा मुस्लिम लीगचा दृष्टिकोन आहे.

काँग्रेस पक्षाने स्वत: आखलेले काही कार्यक्रम आहेत. संपूर्ण स्वराज्यासाठी संघर्ष करणे, कोणत्याही धर्म, जात, पंथ यामध्ये भेदभाव न बाळगणे हा तो कार्यक्रम आहे. यासाठी सर्व संप्रदायाचे काँग्रेसमध्ये स्वागत आहे. या स्वरुपाचा काँग्रेस पक्ष सर्वसमावेशक आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला मुस्लीम लीग निव्वळ मुस्लिम जातीचे प्रतिनिधीत्व करते आहे. मुस्लीम लीगमध्ये इतर जातींसाठी दरवाजे बंद आहेत. यामुळेच मुस्लिम लीग हा धार्मिक समूह ठरतो व तो राजकारणात फुटीरतेचे बीज पेरतो आहे असे मत मुस्लीम लीगविषयी नेहरुंनी नोंदविले.(१६)

पंडित नेहरुंचा भारताच्या फाळणीला त्याचा सक्त विरोध आहे. याला कारण भावनिक नाहीच. त्याचे पुरोगामी व आधुनिक मन त्यांना विश्वास ठेवायला लावते की, एकसंघ भारताच सामर्थ्यशाली भारत ठरु शकतो, खंडित भारत हा कमजोर राष्ट्र असेल जसे की इराक आणि इराण ही दोन्ही राष्ट्रे तशी लहान सार्वभौम नाहीत. या राष्ट्रांना सतत बड्या राष्ट्रांकडे दयेसाठी आशेने पाहावे लागते.

हिंदुस्तानातील सांप्रदायिक तणावाला पाकिस्तान हे उत्तर नाही, असे नेहरुंचे मत होते. दोन्ही प्रांतात अल्पसंख्य समाज राहिल. देश हा धार्मिक आधारे विभागला जाईल. युरोपमध्ये प्रोटेस्ट आणि कॅथोलिक हे दोन्ही संप्रदाय म्हणून एकत्र राहिले. या गोष्टींकडे सर्वांनी बारकाईने पाहणे गरजेचे आहे. मुस्लीम लीगने याचा विचार केला पाहिजे असे नेहरुंचे मत होते.(१७)

मुस्लीम लीगने फक्त मुस्लिम बहुसंख्यांकांची मागणी केली पाहिजे याचा अर्थ पंजाब व बंगाल या मुस्लिम बहुल इलाख्यात स्वातंत्र्याची मागणी मुस्लीम लीग करते. याचा अर्थ पंजाब व बंगालची फाळणी करावी लागेल. पंजाब व बंगालमध्ये अनेक प्रांतात मुस्लिमेतर बहुसंख्य आहेत. त्यांना तुम्ही पाकिस्तान बरोबर या असे सांगू शकत नाही. पंजाब व बंगाली लोकांना मुस्लीम असो वा

हिंदू त्यांचा एकसंघ प्रांत भाषिकदृष्टया तोडलेला आवडेल का? हा प्रश्न आपल्यासमोर उभा राहिल असे नेहरुंचे मत होते.

नेहरु पुढे म्हणाले की, मुस्लीम लीगचा दृष्टिकोन हा स्वयंविरोधाभासी आहे. एखाद्या पुनर्स्थापनेसाठी तुम्ही त्याचे डोके अलग करु शकत नाही. यावर नेहरुंनी असा तोडगा सुचविला की असे मुस्लीम बहुल प्रांत यांना मर्यादित स्वातंत्र्य व स्वायत्तता दिली जाऊ शकते. ज्या ठिकाणी अल्पसंख्य समाजाचे सांप्रदायिक, भाषिक व धार्मिक अधिकाराचे रक्षण करता येईल. या विधानावरुन नेहरुंचे मत फाळणीविरोधी होते असे दिसून येते.(१८)

नेहरु पुढे म्हणतात, सद्य:स्थिती भारत हा पारतंत्र्यात आहे. या अवस्थेत पाकिस्तान निर्मितीचा प्रश्न उभा करणे हे निरर्थक व निराधार आहे. नेहरुंच्या मते युरोपियन राष्ट्राची परिस्थिती भारतापेक्षा फार वाईट आहे. पाकिस्तान निर्मितीच्या घोषणेपेक्षा, फाळणीच्या योजनेपक्षा लहान-लहान राज्यांनी विनाशापासून वाचण्यासाठी एकत्र राहणे ही काळाची गरज आहे. भारत हा विशाल देश आहे. पाकिस्तान सारखे क्षुल्लक प्रश्न निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध साधनसंपत्तीचे नियोजन करणे आणि बेरोजगारीकडे लक्ष देणे अशा गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

ते स्वत: व कॉंग्रेस स्वतंत्र भारत संघ स्थापनेचा गांभीर्याने विचार करत आहेत. पाकिस्तान सारखे प्रश्न उभे राहिल्याने मुख्य मुद्दयांपासून विचलित होण्यासारखे आहे असे नेहरुंना वाटत होते. नेहरुंच्या मते, भारतातील काही सांप्रदायिक समूहानीं भारतीय स्वातंत्र्याला काही अटी घालणे हे दुर्दैवी आहे. स्वातंत्र्य ही सांप्रदायिक समुहाची मूलभूत मागणी नाही याचे कारण म्हणजे परस्परांमध्ये असणारा अविश्वास होय. नेहरुंच्या मते, शीख आणि मुस्लिम या शूर जमाती आहेत. या जमातींना हिंदूंच्यापासून धोका असण्याचे काहीच कारण नाही.(१९)

पंडित नेहरुंच्या मते भारताची फाळणी झाली तर भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान पत्करले त्यांचा अपमान

होईल. भारत - पाकिस्तान फाळणी हा प्रश्न फार गुंतागुंतीचा व गंभीर आहे. नेहरुंच्या मते अनेक देशात अशाप्रकारे प्रश्न आहेत. जर थंड डोक्याने विचार केला तर यातून काही तरी मार्ग निघू शकेल असे नेहरुंना वाटत होते.(२०)

श्रीनगर येथे दि. २ ऑगस्ट १९४५ रोजी नेहरुंनी भाषण केले. नेहरु असे म्हणाले की, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला फाळणी होऊ नये असे ठामपणे वाटते. भारत एकसंघ राहणे हे आर्थिक, सामाजिकदृष्टया महत्त्वाचे आहे. कारण उद्याच्या जगात छोटया राष्ट्रांना काहीही भविष्य असणार नाही. त्यांची अवस्था परावलंबी राष्ट्रांसारखी होईल. जगातील महासत्तांचे सध्याचे धोरण राष्ट्रसंघ उभा करण्याचे आहे. अशा परिस्थितीत हिंदुस्तानची फाळणी झाली तर हिंदुस्तान संपून जाईल असे नेहरुंनी मत मांडले.(२१)

लाहोर २५ येथे झालेल्या भाषणात नेहरु म्हणाले - अणुबॉम्बच्या युध्दामुळे जपानच्या लाखो नागरिकांना जीव गमवावा लागला हे युध्द जिंकूनसुध्दा ब्रिटीश दुसऱ्या दर्जाची महासत्ता म्हणून आकुंचन पावली. अमेरिका व रशिया जागतिक महासत्ता निर्माण झाल्या. जागतिक परिपेक्षात असे बदल होत असताना भारतातील राजकीय पक्ष आपसात लढत आहेत. पक्षामधील लोक पदासाठी संघर्ष करीत आहेत हे भारताला आत्मघातकी ठरेल. पंचवीस वर्षानंतर झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर भारतातील परिस्थिती वेगाने क्रांतींच्या दिशेने वाटचाल करु लागली आणि काँग्रेस हा असा एकच पक्ष आहे की ज्याने सामान्य लोकांबद्दल स्वातंत्र्याबद्दल जागरुकता निर्माण केली.(२२)

मुस्लिम लीग व हिंदू महासभा आज काँग्रेसला विरोध करीत आहे. पण काँग्रेसच या दोन्ही पक्षाची मातृसंख्या आहे हे दोन्ही पक्ष धमक्या देऊन त्याचे इप्सित ध्येय गाठू इच्छित आहे. लोकांनी हे समजावून घ्यावे फुटीरवादाचा विरोध करावा असे मत नेहरुंनी मांडले. मुस्लिम लीगच्या पाकिस्तान मागणीबद्दल बोलत असताना नेहरु म्हणाले, “हिंदुस्तान फोडून एकाला दुसऱ्या सत्तेखाली अंकित ठेवणे हितकारक ठरणार नाही. यामुळे दोन्ही राष्ट्रांचा

आर्थिक विकास होणार नाही. कोणताही समूह वेगळे राष्ट्र मागत असेल तर कॉंग्रेस त्याचा मन वळवण्याचा प्रयत्न करेल पण ते जर अडूनच बसणार असतील तर मात्र आम्ही त्यांना हिंदुस्तानातून वेगळे होण्याचा अधिकार देवू" असे मुस्लीम लीगचे नेते अब्दुर र. निशटर यांनी जाहीर केले. नेहरुंनी असे मत मांडले की, "मुस्लीम लीग हा एक आक्रमक वृत्तीचा पक्ष आहे व ते महात्मा गांधींच्या अहिंसेच्या दृष्टिकोनाशी सहमत होणार नाहीत असे मत मांडले."(२३)

याचवेळी उत्तर-पूर्व प्रांत मुस्लीम लीगचे नेते अब्दुल खयोम खान यांनी असे जाहीर केले की या भागातील आदिवासी लोक संपूर्ण शस्त्र हल्ल्याच्या तयारीत पाकिस्तानच्या बाजूने लढण्यास सज्ज आहेत.

या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस कार्यकारिणी समितीने काही निष्कर्ष काढले -

१) कॉंग्रेस पक्ष ब्रिटीश राज्यात पसरविणे, त्याचप्रमाणे इंग्लंडमधील मजूर पक्षाने उच्चस्तरीय समिती पाठविलेली होती त्याचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे.

२) कॉंग्रेस पक्षाने मुस्लिम अल्पसंख्यांकाना जास्तीत जास्त सवलती देण्याची तयारी दर्शवली. भारतीय घटनेत केंद्रशासनास नियंत्रित सत्ता देणे व उर्वरीत सत्ता जास्तीत जास्त घटक राज्यांकडे देण्याची तयारी दर्शविणे. घटनेमध्ये धार्मिक व सांस्कृतिक हक्कांना संरक्षण देणे या सर्व गोष्टींस तयारी दर्शविली. या सर्व गोष्टींना जीनांनी विरोध दर्शविला होता.

जीनांनी १९१६ मध्ये स्वतंत्र मतदारंसघाची मागणी, १९२९ मध्ये चौदा मागण्या केल्या आणि १९४० मध्ये फाळणीची मागणी केली. जिनांनी सहा प्रांत पाकिस्तानमध्ये समाविष्ठ केले. आसाम, बंगाल, पंजाब या प्रांतांची मागणी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या प्रांतामध्ये ३३ टक्के मुस्लीम बहुसंख्यांक आहेत. या मागणीमध्ये कॉंग्रेसला असे दिसून आले की, या प्रांतात बरेचसे लोक बिगर मुस्लीम धर्मीय आहेत. अशा प्रकारची मागणी मुस्लीम लीगने का करावी असा प्रश्न निर्माण होतो.

फाळणीविषयी ज्या गोष्टी कारणीभूत ठरल्या त्याबाबत बऱ्याच निर्णयात्मक गोष्टीत नेहरुच कारणीभूत ठरल्याचे दिसून येते. भाषिक भारतीय काँग्रेसची ७ जुलै १९४६ ची बैठक याबाबत महत्त्वाची ठरते. याच बैठकीत काँग्रेसच्या अध्यक्षपदाची सूत्रे नेहरूंनी अबुल कलाम आझाद यांच्याकडून आपल्याकडे घेतली. या बैठकीत नेहरु म्हणाले, "आम्ही कोणत्याही एका गोष्टीशी बांधील नाही. आम्ही आता घटना समितीच्या कामकाजास सुरुवात करणार आहोत."(२४)

... आम्ही नुसते घोषणाबाजी करुन महत्त्वाची जबाबदारी टाळू शकत नाही. आज जग ... काँग्रेसच्या महत्त्वाच्या निर्णयांकडे लक्ष देत आहे. फक्त आपण एकमेकांचे उणे-धुणे काढून, एकमेकांवरील टीका करीत आहोत. या गोष्टीचा काहीही उपयोग होणार नाही. ... घटना समितीच्या बाबतीत ज्या काही टीका होत आहेत त्याकडे दुर्लक्ष करुन पुढे पाऊल टाकू व त्याच पध्दतीने ब्रिटीश शासनाचे वर्चस्व झुगारुन देऊ, त्याचप्रमाणे आम्ही कोणताही हूकूम सहन करणार नाही. या भाषणानंतर १० जुलै रोजी पत्रकार परिषदेत बऱ्याच गोष्टींचे स्पष्टीकरण केले ... ज्यावेळेस काँग्रेसने घटना समितीची मसुदा समिती ही सार्वभौम तत्त्वावर आधारीत आहे असे कॅबिनेट योजनेला कळविले, तर कॅबिनेट योजनेने सकारात्मक उत्तर देते असे कळविले की दोन महत्त्वाच्या शिफारशींवर आधारीत याचा स्वीकार केला जाईल. त्या शिफारशी - (१) अल्पसंख्यांकाच्या योग्य तरतूदी, (२) भारत व ब्रिटीशांमधला समझोता करार याचे पालन.

या दोन शिफारशी नेहरुंना आवडल्या नाहीत. पण त्याचा कॅबिनेट योजनेला विरोध नव्हता. पण स्वातंत्र्यानंतर भारत व ब्रिटीशांचे संबंध राहण्याबद्दल त्यांच्या मनात कोणताही संकोच नव्हता.(२५)

या सर्व घडामोडीनंतर अखिल भारतीय मुस्लिम लीगचे महासचिव लियाखत अली खान यांनी नेहरुंच्या पत्रकार परिषदेआधीच मुस्लिम लीगची मिटींग घेऊन कॅबिनेट योजनेचा पाठिंबा काढून घेतला. त्यांनी घटना

समितीत सहभागी न होण्याचा निर्धार जाहीर केला. लियाकत अली खान यांनी असे जाहीर केले की, मुसलमानांनी तयार व सज्ज राहावे. आम्हास शांती व सन्मान हवे आहेत पण युध्द झाल्यास आपण ते आव्हान स्वीकारावयास हवे, असे त्यांनी जाहीर केले आणि फाळणीच्या मागणीचा जोर चढल्याचे दिसून येते.(२६)

काही टीकाकार असेही आपले मत मांडतात की नेहरुंच्या या वक्तव्यामुळे जीनांना कॅबिनेट मशिन योजना व घटना समितीतून बाहेर पडण्यास संधी प्राप्त झाली. बऱ्याच वक्तव्यामुळे मुस्लिम लीग व जीना यांनी फाळणीच्या मागणीचा जोर धरला व फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

नेहरुंच्या पाकिस्तानसंबंधी मताचा विचार करता असे म्हणता येईल की नेहरुंना राजकारणात भारताचे स्वातंत्र्य त्यांना महत्त्वाचे वाटत होते. नेहरु व कॉंग्रेस इंग्रजी शासनाला विरोध करत होते. नेहरुंचे असे मत होते की, स्वातंत्र्य मिळविताना पाकिस्तान या मागणीला महत्त्व नाही. नेहरुंनी मुस्लिम लीग संघटनेला कॉंग्रेस ही मुस्लिम विरोधी नाही हे सांगण्याचा प्रयत्न केला होता. कॉंग्रेसमध्ये अनेक मुस्लिम नेते होते. मुस्लीम लीगने मात्र जातीच्या आधारावर संघटनेचे काम करत असताना फाळणीची मागणी केली. शेवटी नेहरु व कॉंग्रेस पक्ष या मुस्लीम लीगच्या धोरणांना कंटाळली व फाळणीस मान्यता दिल्याचे दिसून येते. फाळणी ही त्यावेळच्या राजकीय कोंडी होती असे म्हणता येईल.

# संदर्भसूची


१ गोरे ना. ग. - पंडित जवाहरलाल नेहरु, आत्मकथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८८, पृ. ७-१३.

२ पूर्वोक्त ... पृ. १९.

३ Brown M Judit - Nehru : A Political Biography, Oxford University, Press, 2004, p. 62.

४ Nehru J. - An Autobiography, Allied Publisher, Bombay, 1962, p. 35.

५ शिंदे ज. रा. - नेहरुंचे धर्म व जमात विषयक विचार, पंडित नेहरु विचारदर्शन, (संपादक - नागोराव कुंभार) प्रबोधन प्रकाशन, लातूर १९८९, पृ. ७२ ते ७५.

६ पूर्वोक्त... ७३ - ७४

७ पूर्वोक्त... ७५

८ Nanda B. R. - Jawaharlal Nehru, Delhi, Oxford University Press, Mumbai - 1998, p. 125-28.

९ पूर्वोक्त... १२७.

१० Press Statement Allahabad, 30[th] June 1937, Tribune.

११ Brown M. Judit - Nehru : Political Biography, Op Cit, 84.

१२ Hindustan Times, 4 October 1947.

१३ Nanda B. R. - Jawaharlal Nehru, Op Cit, p. 130-132.

१४ पूर्वोक्त - १३१ - १३२.

१५ Jagat S. Bright, M. A. - Important, Speeches of Jawaharlal Nehru - The Hedian Printing Works, Lahore, November 1945, 197 - 205.

१६ पूर्वोक्त ... १९८.

१७ पूर्वोक्त ... १९९.

१८ पूर्वोक्त ... १९९.

१९ पूर्वोक्त ... २००.

२० पूर्वोक्त ... २००.

२१ पूर्वोक्त ... २०१.

२२ पूर्वोक्त ... २०२.

२३ Dawn, 26th March 1946.

२४ Nanda B. R. : Jawaharlal Nehru, Op Cit - 151 to 153.

२५ पूर्वोक्त ... १५२.

२६ पूर्वोक्त ... १५३.

15146